पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८
वैद्यकीय विभाग, (धन्वंतरी कक्ष)
क्रमांक:- वैद्य/१४/कावि/८३१/२०१६
दिनांक - ०८ /१२/२०१६

**विषय :- धन्वंतरी स्वास्थ्य योजना अंमलबजावणीबाबत...**
**संदर्भ :- धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३.**

**परिपत्रक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी तसेच कुटूंब व्याख्येनुसार त्यांचेवर अवलंबुन असणारे कुटूंबीय आणि सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी (पती/पत्नी) यांचेसाठी धन्वंतरी स्वास्थ्य योजना दिनांक १ सप्टेंबर २०१५ पासून सुरु करणेत आली आहे.

धन्वंतरी योजना सुरु झालेपासून माहे ऑक्टोबर २०१६ अखेर ५५५५ अधिकारी/कर्मचारी आणि त्यांचे अवलंबित यांनी धन्वंतरी योजनेच्या पॅनलवरील रुग्णालयांत उपचार घेतले आहेत.

सदरची योजना ही मनपा कर्मचारी हिस्सा व मनपा फंडातील हिस्सा एकत्रित करुन, त्या निधीमधून कार्यरत व निवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय सेवा पुरविली जाते. याबाबत सर्व अधिकारी/कर्मचारी यांना या योजनेत समाविष्ट होणे बंधनकारक असून सर्व कर्मचाऱ्याची वर्गणी (दरमहा ३००) फंडात जमा होणे गरजेचे व अनिवार्य आहे.

तथापि धन्वंतरी कक्षाचे असे निदर्शनास आले आहे कि बरेच कर्मचारी दिर्घ मुदतीसाठी विनापरवाना किंवा वैद्यकीय कारणास्तव कामावर उपस्थित नसतात. त्यावेळी त्यांना पगार अदा केला जात नाही. पर्यायाने सदर कर्मचाऱ्याची धन्वंतरी हिस्सा देखील मनपाकडे जमा होत नाही. अशा वेळी सदर फंडामध्ये उपचार घेणाऱ्यांची संख्या जास्त परंतू धन्वंतरीची कपात न झाल्याने सदर फंडामध्ये कमी रक्कम जमा होते. सबब याबाबत सर्व विभागप्रमुखांनी त्यांचे नियंत्रणाखालील आस्थापना कर्मचाऱ्यांनी याबाबत दक्षता घेवून धन्वंतरी हिस्सा कपात होत आहे किंवा नाही याबाबत काळजी घेणेकामी सुचना देणेत यावी. तसेच पुरवणी पगारबील अदा करतेवेळी धन्वंतरी हिस्सा कपात करणेत यावा.

तसेच सदयस्थितीमध्ये जे कर्मचारी विनापरवाना/वैद्यकीय कारणास्तव माहे मे २०१५ पासून सलग ६ महिन्यापासून किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी गैरहजर असेल कामावर उपस्थित नाही व त्यांचा पगार काढलेला नाही त्यांची नावे त्वरीत धन्वंतरी कक्षास कळविणेत यावी. सदरची माहिती दि. १८/१२/२०१६ पर्यंत या विभागास पाठवावी.

कर्मचाऱ्याची वर्गणी कपात न होता त्याने वैद्यकीय उपचार धन्वंतरी अंतर्गत घेतले असल्यास त्या बिलांची वसुली सदर कर्मचाऱ्याच्या पगारातून करण्यात येईल. तसेच चालू महिन्याअखेर वर्गणी जमा करताना महापालिका हिश्यासह वर्गणी धन्वंतरी फंडामध्ये जमा करणेत यावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी,**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी ४११०१८.**

**प्रति,**

**सर्व संबधित शाखाप्रमुख**
**विभाग**

**२-सदरचे परिपत्रक सर्व कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणून देण्यात यावे व पगारबील लिपीकाने प्रत्येक महिन्यात सर्वांची धन्वंतरीची वर्गणी कपात करणेबाबत दक्षता घ्यावी.**

T-81